महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.९/COVID-१९-१०/ १११५१
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक : ०७.०६.२०२०

# परिपत्रक

**विषय :** **Mission Begin Again अंतर्गत M.M.R. क्षेत्रातील बृहन्मुंबई महानगरपालिकेसह सर्व महानगरपालिका, तसेच पुणे, सोलापूर, औरंगाबाद, मालेगाव, नाशिक, धुळे, जळगाव, अकोला, अमरावती आणि नागपूर या महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये कंपनीच्या कार्यालयातील अधिकारी/ कर्मचारी यांच्या उपस्थितीबाबत.**

**संदर्भ :** १) परिपत्रक क्र. मासं/रवका/न.क्र.९/COVID-१९-६/९४२७ दि. ०३.०५.२०२०.
२) शासन आदेश क्र. डीएमयु २०२०/सीआर ९२/डीआयएसएम-१ दि. ३१.०५.२०२०.
३) परिपत्रक क्र. मासं/रवका/न.क्र.९/COVID-१९-९/९९६९ दि. ३१.०५.२०२०.
४) शासन परिपत्रक क्र. संकीर्ण १०२०२/प्र.क्र. ०१/ सचिव (व्यय) दि. ०५.०६.२०२०
५) शासन निर्णय क्र. समय २०२०/प्र.क्र.३५/१८(र. व का.) दि. ०५.०६.२०२०.
६) शासनाचे पत्र क्र. करोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि. ०५.०६.२०२०.
७) शासन परिपत्रक क्र. समय २०२०/प्र.क्र.३५/१८(र. व का.) दि. ०५.०६.२०२०.

कोविड - १९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाकडून तसेच कंपनीकडून कार्यालयीन उपस्थिती मर्यादित ठेवण्याबाबत वेळोवळी सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. संदर्भ क्र. २ मधील शासन आदेशाच्या धर्तीवर संदर्भ क्र. ३ अन्वये वाढीव बंद (Lock Down) संदर्भात आणि नियंत्रीत / प्रतिबंधीत (Containment Zone) केलेले क्षेत्र वगळता M.M.R. क्षेत्रातील बृहन्मुंबई महानगरपालिकेसह सर्व महानगरपालिका, तसेच पुणे, सोलापूर, औरंगाबाद, मालेगाव, नाशिक, धुळे, जळगाव, अकोला, अमरावती आणि नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील कंपनीच्या प्रशासकीय कार्यालयांमध्ये दि. ०३.०६.२०२० पासून एकूण कर्मचारी संख्येच्या १५% किंवा १५ कर्मचारी यापैकी अधिक असेल तेवढया कर्मचाऱ्यांची उपस्थिती आवश्यक असल्याच्या सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

२. सद्यस्थितीत संदर्भ क्र. ५ मधील शासन निर्णयान्वये सुधारीत आदेश पारीत करण्यात आले असून, त्यानुसार कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी कामाप्रती निष्ठा ठेवणे अनिवार्य आहे तसेच कार्यालयातील कामाचे कर्मचारी निहाय समन्यायी वाटप होणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने खालील मार्गदर्शक सूचना प्रसारीत करण्यात येत आहेत.

अ) नियंत्रीत / प्रतिबंधीत (Containment Zone) केलेले क्षेत्र वगळता **M.M.R. क्षेत्रातील बृहन्मुंबई महानगरपालिकेसह सर्व महानगरपालिका, तसेच पुणे, सोलापूर, औरंगाबाद, मालेगाव, नाशिक, धुळे, जळगाव, अकोला, अमरावती आणि नागपूर महानगरपालिका** क्षेत्रामधील कंपनीच्या प्रशासकीय कार्यालयांमध्ये प्रत्येक विभागानी आपले अधिनस्त सर्व कर्मचारी / अधिकारी यांच्याबाबत रोस्टर तयार करावे ज्यामध्ये प्रत्येक कर्मचारी / अधिकारी आठवडयात किमान एक दिवस कार्यालयात उपस्थित राहतील. पूर्वमंजूर अर्जित व तत्सम तसेच वैद्यकीय कारणास्तव रजेवर असलेल्या कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त सर्व कर्मचाऱ्यांपैकी प्रत्येक कर्मचाऱ्याला आठवडयातून किमान एक दिवस कार्यालयात हजर राहणे अनिवार्य राहील.

ब) संबंधित नियंत्रण अधिकारी सर्व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीबाबतच्या रोस्टरचे आदेश काढतील, सदर आदेशानुसार निर्देशित दिनांकास कर्मचारी / अधिकारी अनुपस्थित राहील्यास त्या पूर्ण आठवडयाची अनुपस्थिती गृहीत धरून सदरचा कालावधी अर्जित वा विनावेतन रजा समजण्यात येईल.

क) आठवडयात एकापेक्षा अधिक दिवशी कर्मचाऱ्यास उपस्थित राहण्याबाबत आदेशित करण्यात आले असेल तर त्यापैकी जे दिवस सदर कर्मचारी उपस्थित असेल ते वगळून त्या आठवडयातील अन्य दिवसांची अनुपस्थिती अर्जित वा विनावेतन रजा समजण्यात येईल.

Scanned with CamScanner

ड) तसेच उपरोक्त महानगरपालिका क्षेत्रामध्ये कार्यरत असणारे आणि ज्यांच्या सेवा अत्यावश्यक सेवा प्रकारात येतात असे अधिकारी, अभियंते तसेच यंत्रचालक व तंत्रज्ञ संवर्गातील कर्मचारी यांची १००% उपस्थिती आवश्यक राहील.

इ) वरील सूचना विचारात घेउन संबंधित नियंत्रण अधिकारी यांनी प्रत्येक महिन्याच्या अखेरीस सर्व कर्मचाऱ्यांचा प्रमाणित केलेला हजेरी अहवाल वेतन व देयके / मासं विभागास सादर करावा.

फ) आहरण व संवितरण अधिकारी यांनी कर्मचाऱ्यांची उपस्थिती विचारात घेउनच वेतन व देयके आहरित करावीत व 'उपरोक्त सूचना विचारात घेउन केवळ उपस्थिती कालावधीचेच वेतन आहरित करण्यात आले आहे याची मी खात्री केली आहे' असे प्रमाणपत्र जोडावे, त्या अनुषंगाने वेतन व देयके अदा करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

ग) बाहय यंत्रणेव्दारे नियुक्त अधिकारी व कर्मचारी यांनादेखील वरीलप्रमाणे रोस्टरनुसार उपस्थितीबाबतच्या सूचना लागू राहतील.

ह) तसेच, संदर्भ क्र. १ मधील परिपत्रकान्वये प्रसारीत करण्यात आलेल्या सूचनांनुसार जे कर्मचारी नजिकच्या कार्यालयात उपस्थित रहात आहेत अशा सर्व कर्मचाऱ्यांना संबंधित नियंत्रण अधिकाऱ्यांनी तात्काळ कार्यमुक्त करावे व अशा कर्मचाऱ्यांनी रोस्टरनुसार त्यांच्या मूळ कार्यालयात रूजू व्हावे, अन्यथा असे कर्मचारी विनापरवाना गैरहजर असल्याचे समजण्यात येईल.

३. सदरच्या सूचना दि. ०८.०६.२०२० पासून अंमलात येतील व उपरोक्त महानगरपालिका क्षेत्रातील कंपनीच्या सर्व प्रशासकीय कार्यालयांना दि. ३०.०६.२०२० पर्यंत लागू राहतील.

४. उपरोक्त महानगरपालिका क्षेत्र वगळता इतर क्षेत्रामधील कंपनीच्या सर्व कार्यालयांमध्ये १००% कर्मचाऱ्यांची उपस्थिती आवश्यक आहे.

५. संदर्भ क्र. ६ मधील पत्रान्वये शासनाने, शासकीय अत्यावश्यक सेवेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांना येण्या-जाण्यास अडथळा आणण्यात येणार नाही, तसेच शासकीय वाहनांना जिल्हाबंदी लागू राहणार नाही त्याचप्रमाणे वाहतूक परवान्याची आवश्यकता राहणार नाही, अशा सूचना जारी केलेल्या आहेत. त्या अनुषंगाने कंपनीच्या अधिकारी / कर्मचारी यांनी रोस्टरनुसार त्यांच्या मूळ कार्यालयात उपस्थित राहणे आवश्यक राहील.

६. तसेच संदर्भ क्र. ७ मधील शासन परिपत्रकान्वये पारीत करण्यात आलेल्या सुचनांच्या अनुषंगाने, कंपनीचे अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांच्या घरामध्ये राहूनही आवश्यकतेनुसार व तातडीनुसार कार्यालयीन कामकाजाचा निपटारा करणेसाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. याकरीता कंपनीच्या कामकाजासाठी तसेच संबंधितांना सूचना / आदेश देण्यासाठी कंपनीचे मेल, कर्मचाऱ्यांच्या नेहमीच्या वापरातील अन्य ईमेल तसेच व्हॉटसअॅपचा वापर करण्यात यावा, यासाठी शासन परिपत्रकातील मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करण्यात यावा.

७. यापूर्वी कोवीड - १९ च्या व्यवस्थापनाबाबत वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरेपणे पालन करावे.

८. सदर परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**सोबत :** १. दि. ०५.०६.२०२० रोजीचा शासन निर्णय.
२. दि. ०५.०६.२०२० रोजीची दोन्ही शासन परिपत्रके.
३. दि. ०५.०६.२०२० रोजीचे शासनाचे पत्र.

**(कमांडर शिवाजी इंदलकर)(से.नि.)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

Scanned with CamScanner

**मर्यादित उपस्थितीच्या काळात शासकीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या उपस्थिती सुनिश्चित करणे व वेतन आहरित करण्याबाबत सूचना**

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
शासन परिपत्रक क्र. संकीर्ण १०२०२०/ प्र. क्र. ०१ / सचिव (व्यय)
दिनांक : ५ जून, २०२०

परिपत्रक-

कोव्हिड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जारी केलेल्या लॉकडाऊन काळात राज्यशासकीय कर्मचाऱ्यांची कार्यालयीन उपस्थिती मर्यादित ठेवण्याबाबत वेळोवेळी शासनाकडून सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार मर्यादित संख्येत अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत मंत्रालयीन विभाग व क्षेत्रीय कार्यालयातील कामकाज सुरू आहे. तथापि, असे निदर्शनास आले आहे की, विभागातील काही अधिकारी/कर्मचारी लॉकडाऊन कालावधी दरम्यान पूर्व परवानगी शिवाय गैरहजर आहेत तसेच मुख्यालय सोडून अन्य गावी गेले आहेत त्यामुळे कार्यालयात उपस्थित राहणाऱ्या कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा अनाठायी ताण येत आहे.

शासकीय कर्मचाऱ्यांनी शासकीय कामाप्रती सर्वतोपरी निष्ठा ठेवणे अनिवार्य आहे तसेच कार्यालयातील कामाचे कर्मचारी निहाय समन्यायी वाटप होणेही आवश्यक आहे. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. प्रत्येक विभागानी आपले अधिनस्त सर्व कर्मचारी/ अधिकारी बाबत रोस्टर तयार करावे ज्यामध्ये प्रत्येक कर्मचारी / अधिकारी आठवडयात किमान एक दिवस कार्यालयात हजर राहतील. पूर्वमंजूर अर्जित व तत्सम तसेच वैद्यकीय कारणास्तव रजेवर असलेल्या कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त सर्व कर्माचाऱ्यांपैकी प्रत्येक कर्मचाऱ्याला आठवड्यातून किमान एक दिवस कार्यालयात हजर राहणे अनिवार्य राहिल. सदर कर्मचाऱ्याने उपस्थित रहावयाच्या दिनांकाबाबत विभागप्रमुख, आस्थापनाशाखा यांनी आदेश काढावेत.

२. सर्व अधिकारी / कर्मचारी यांना त्यांना नेमून दिलेल्या उपस्थिती च्या दिनांकास कार्यालयात उपस्थित राहणे अनिवार्य आहे. लॉकडाऊन च्या कालावधीत जे अधिकारी / कर्मचारी यांनी विनापरवानगी



Scanned with

मुख्यालय सोडले आहे त्यांच्या विरुद्ध म.ना.से.(वर्तणूक )नियम १९७९ अंतर्गत शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबत सर्व प्रशासकीय विभाग यांनी कार्यवाही करावी.

३. निर्देशित दिनांकांना सदर कर्मचारी अनुपस्थित राहिल्यास सदर कर्मचाऱ्याची त्या आठवड्याची अनुपस्थिती देय व अनुज्ञेय अर्जित वा यथास्थिती विनावेतन रजा म्हणून नियमित करण्यात यावी.

४. आठवड्यात एकापेक्षा अधिक दिवशी कर्मचाऱ्यास हजर राहण्याबाबत आदेशित करण्यात आले असेल तर त्यापैकी जे दिवस सदर कर्मचारी उपस्थित असेल ते वगळून त्या आठवडयातील अन्य दिवसांची अनुपस्थिती देय व अनुज्ञेय अर्जित वा यथास्थिती विनावेतन रजा म्हणून नियमित करण्यात यावी. .

५. आहरण व संवितरण अधिकारी यांनी कर्मचाऱ्यांची उपस्थिती विचारात घेऊनच वेतन देयके आहरित करावीत व देयकासोबत "शासन परिपत्रक क्र. संकीर्ण १०२०२० / प्र.क्र. ०१ / सचिव (व्यय), दिनांक ५ जून, २०२० मधील सूचना विचारात घेऊन केवळ उपस्थिती कालावधीचेच वेतन आहरित करण्यात आले आहे याची मी खात्री केली आहे" असे प्रमाणपत्र जोडावे त्याआधारे कोषागारांनी वेतन देयके पारीत करावीत.

६. सदर आदेश दि. ०८ जून, २०२० पासून आंमलात येतील. तसेच ते सर्व शासकीय कार्यालये व शासनाच्या अधिपत्याखालील महामंडळे, आस्थापना यांना लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

MSaink 5/6/2020

(मनोज सौनिक)
अपर मुख्य सचिव (वित्त)

प्रत माहितीसाठी
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२
प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी,
अ.मु.स./प्र.स./सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
त्यांना विनंती करण्यात येते की, सदर सूचना त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून त्यांचे काटेकोर पालन करण्याबाबत सूचना दयाव्यात.
संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांनी सदर सुचना सर्व कोषागारे तथा अधिदान व लेखाधिकारी यांच्या निदर्शनास आणाव्यात.



Scanned with

**महाराष्ट्र राज्यात "Mission begin again" या अंतर्गत M.M.R. कार्यक्षेत्रातील बृहन्मुंबई महानगरपालिकेसह सर्व महानगरपालिका, तसेच पुणे, सोलापूर, औरंगाबाद, मालेगाव, नाशिक, धुळे, जळगाव, अकोला, अमरावती आणि नागपूर या महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये राज्य शासकीय कार्यालयातील अधिकारी/ कर्मचारी यांच्या उपस्थितीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : समय २०२०/प्र.क्र.३५/१८(र.वका.)**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०००३२
दिनांक : ५ जून, २०२०

वाचा:- :

१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : समय-२०२० / प्र. क्र. ३५ / १८(र.वका.), दिनांक ४ मे, २०२०,
२. शासन आदेश, आपत्ती व्यवस्थापन व मदत व पुनवर्सन, क्रमांक :डीएमयू २०२०/सीआर ९२/डीआयएसएम-१, दिनांक ३१ मे, २०२०,
३. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : संकीर्ण १०२०२० / प्र. क्र. १ / सचिव (व्यय), दिनांक ५ जून, २०२०.

**शासन निर्णय:-**

कोरोना विषाणूंचा (COVID-१९) प्रसार राज्य शासकीय कार्यालयांमध्ये होऊ नये, तसेच शासकीय कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांना त्यांचा संसर्ग होऊ नये म्हणून विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याच्या दृष्टीने या विभागाच्या संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

२. उक्त संदर्भ क्र. १ येथील दि.४.५.२०२० रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. २ (अ) येथील तरतूदीअन्वये **मुंबई महानगर प्रादेशिक विकास क्षेत्र** (M.M.R.) **तसेच पुणे महानगर पालिका** (P.M.C.), **मालेगाव महानगर पालिका तसेच पिंपरी-चिंचवड महानगर पालिका** (P.C.M.C.) **यांच्या कार्यक्षेत्रातील शासकीय कार्यालयांतील एकूण उपस्थिती** ५ **टक्क्यांपर्यंत ठेवण्यात आलेली आहे**.

आता, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय यांच्या उक्त संदर्भ क्र. २ येथील दि. ३१ मे, २०२० च्या आदेशांन्वये राज्यातील लॉकडाऊनचा कालावधी दि.३० जून, २०२० पर्यंत वाढविण्यात आला असून राज्यात "Mission begin again" या अंतर्गत फेज I, II, III अन्वये यापूर्वी घालण्यात आलेल्या विविध निर्बंधामध्ये सवलती देण्यात आल्या आहेत. त्यानुसार या आदेशामधील परिच्छेद क्र.६(iv) येथे नमूद केलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार आदेशाच्या Annexure(II) येथील मुद्दा क्र.(viii) मधील तरतूदीत केलेल्या वाढीच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे सुधारित आदेश देण्यात येत आहेत:-

(अ) **मुंबई महानगर प्रादेशिक विकास क्षेत्र** (M.M.R.) **या कार्यक्षेत्रातील बृहन्मुंबई महानगरपालिकेसह सर्व महानगरपालिका तसेच पुणे**, **सोलापूर**, **औरंगाबाद**, **मालेगाव**, **नाशिक**, **धुळे**, **जळगाव**, **अकोला**, **अमरावती आणि नागपूर महानगरपालिका**, या कार्यक्षेत्रातील सर्व राज्य शासकीय कार्यालयामधील उपस्थिती (उक्त दि.**३१.५.२०२०** च्या आदेशातील परिच्छेद क्र**. ६(iv)** येथे नमूद केलेल्या अत्यावश्यक सेवा वगळून**)**, **दि. ३ जून, २०२०** पासून **१५** टक्के किंवा कमीत कमी **१५** कर्मचारी यापैकी जे जास्त असेल इतकी ठेवण्यात यावी.

ब) याअनुषंगाने रोटेशन पध्दतीने कार्यालयीन उपस्थिती निश्चित करण्यासाठी प्रत्येक मंत्रालयीन सचिव/संबंधित कार्यालयप्रमुख यांनी आवश्यक ती उपाययोजना करावी. त्याचप्रमाणे वित्त विभागाच्या संदर्भ क्रमांक ३ येथील दिनांक ५ जून, २०२० च्या परिपत्रकातील सूचनांचेसुद्धा काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

क) उर्वरित संपूर्ण राज्यातील शासकीय कार्यालयातील उपस्थिती ही आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय यांच्या उक्त संदर्भ क्र. २ येथील दि. ३१ मे, २०२० रोजीच्या आदेशाप्रमाणे राहील.

३. त्याचप्रमाणे सर्व राज्य शासकीय अधिकारी व कर्मचारी (बाह्य यंत्रणेद्वारे नियुक्त अधिकारी व कर्मचारी यांचेसह) यांनी शासकीय कार्यालयामध्ये कोरोना विषाणूंचा प्रसार रोखण्याच्या दृष्टीने या विभागाच्या उक्त संदर्भ क्र. १ येथील दि. ४.५.२०२० व आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग यांच्या उक्त संदर्भ क्र. २ येथील दि.३१ मे, २०२० रोजीच्या आदेशातील Annexure I येथे नमूद "कोवीड-१९ च्या व्यवस्थापनाबाबत राष्ट्रीय

मार्गदर्शक सूचना" (National directives for Covid-१९ Management) या मथळयाखाली नमूद सर्व सूचना तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाने वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या आदेशातील सर्व मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

४. उपरोक्त सूचना पुढील आदेशापर्यन्त लागू राहतील.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र.२०२००६०५१४०३२६१२०७ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Anshu Sinha

Digitally signed by Anshu Sinha
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a3a7504068b24f4e7eb0277456c1fe4e5d31e4d0b0fdc81eb8816e33c5735b5b, serialNumber=e71208cc885f6d3c01b374ed0921df256abda4ed94d69472deb566c39b4ee68c, cn=Anshu Sinha
Date: 2020.06.05 15:17:13 +05'30'

**( अन्शु सिन्हा )**
**सचिव ( प्र.सु.व.र.व.का )**

**प्रत :**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव (५ प्रती),
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य,
६. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव(५ प्रती), मंत्रालय, मुंबई ४०००३२.
७. मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
८. सर्व मा.मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
९. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
१०. मा.महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य,
११. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
१२. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
१३. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई
१४. प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय,

१५. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
१६. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१७. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
१८. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, मुंबई,
१९. राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग, मुंबई,
२०. सर्व विभागीय आयुक्त,
२१. आयुक्त, सर्व महानगर पालिका,
२२. व्यवस्थापकीय संचालक, BEST महामंडळ, मुंबई
२३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,(MSRTC), मुंबई
२४. सर्व जिल्हाधिकारी,
२५. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२६. सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील सर्व विभागप्रमुख / प्रादेशिक प्रमुख / कार्यालय प्रमुख,
२७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (५ प्रती ),
२८. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरेक नं.१, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई ४०००२०.
२९. इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस(आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-४०००२५.
३०. नॅशनलीस्ट कॉंग्रेस पार्टी, ठाकरसी हाऊस, जे.एन.हेरेडीया मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई ४०००३८.
३१. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-४०००२८.
३२. बहुजन समाज पार्टी, प्रदेश सचिव, महाराष्ट्र राज्य, बी.एस.जी.भवन, प्लॉट नं. ८३-अे, कलेक्टर कॉलनी, चेंबूर, मुंबई-४०००१४.
३३. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई ४००००४.
३४. भारतीय कम्युनिस्ट(मार्क्सवादी) पार्टी, महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई ४०००१३.
३५. महाराष्ट्र नवनिर्माण सेवा, राजगड, मातोश्री टॉवर, शिवाजी पार्क, दादर, मुंबई ४०००२८.
३६. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने, मंत्रालय, मुंबई ४०००३२
३७. निवड नस्ती (का.१८), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई४०००३२.

**महाराष्ट्र राज्यात कोरोना विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून लागू करण्यात आलेल्या लॉक डाऊनच्या अनुषंगाने राज्यात शासकीय कामकाजासाठी ईमेल तसेच व्हॉट्सअॅपचा वापर ग्राह्य धरण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांक : समय २०२०/प्र.क्र.३५/१८(र.व का.)**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०००३२
दिनांक : ५ जून, २०२०

वाचा:- :

१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : समय-२०२० / प्र. क्र. ३५ /१८ (र.व का.), दिनांक १८ एप्रिल, २०२०,
२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : समय-२०२० / प्र. क्र. ३५ /१८ (र.व का.), दिनांक २२ एप्रिल, २०२०,
३. केंद्रशासनाच्या गृह मंत्रालयाची अधिसूचना क्र. ४०-३/२०२०-डीएम-आय-(ए) दि. १ मे, २०२०,
४. शासन अधिसूचना, आपत्ती व्यवस्थापन व मदत व पुनवर्सन, क्रमांक : डीएमयू २०२० / सी आर ९२ / डीआयएसएम-१, दिनांक २ मे, २०२०.
५. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : समय-२०२० / प्र. क्र. ३५ /१८ (र.व का.), दिनांक ४ मे, २०२०,

**शासन परिपत्रक :-**

कोरोना विषाणूंचा (COVID-१९) प्रसार राज्य शासकीय कार्यालयांमध्ये होऊ नये, तसेच राज्यातील अधिकारी / कर्मचारी यांना त्यांचा संसर्ग होऊ नये म्हणून विविध प्रतिबंधात्मक उपाय योजना राबविण्याच्या दृष्टीने या विभागाच्या संदर्भ क्रमांक **१, २** व **५** येथील शासन निर्णयान्वये विविध सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

२. लॉकडाऊनच्या कालावधीत राज्य शासकीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांची उपस्थिती नियंत्रित करण्यात येत आहे. तसेच भविष्यातही अशा प्रकारची परिस्थिती लक्षात घेता शासकीय अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांचे घरातच राहूनही कार्यालयीन आवश्यकतेनुसार व तातडीनुसार शासकीय कामकाजाचा निपटारा करणेसाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. यासाठी शासकीय ईमेल (जसे एनआयसी मेल, इ.), त्यांच्या नेहमीच्या वापरातील अन्य ईमेल तसेच व्हॉट्सअॅपचा वापर शासकीय कामकाजासाठी तसेच संबंधितांना सूचना / आदेश देण्यासाठी करणे ग्राह्य धरण्यात येईल.

३. सबब सर्व राज्य शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-

अ) प्रत्येक अधिकारी / कर्मचारी यांनी, त्यांचे शासकीय ई-मेल आयडी / त्यांच्या नेहमीच्या वापरातील अन्य ई-मेल आयडी तसेच एस.एम.एस / व्हॉट्सॲपची सुविधा असलेला मोबाईल क्रमांक, त्यांचे कार्यालय प्रमुखांस उपलब्ध करून द्यावा.

ब) शासकीय कामकाजासाठी शासकीय ई-मेल आयडी / त्यांच्या नेहमीच्या वापरातील अन्य ईमेल आयडी तसेच व्हॉट्सॲपचा वापर करून त्यांच्या कामाचा जास्तीत जास्त निपटारा करावा.

क) प्रस्ताव ई-मेलद्वारे फॉरवर्ड केल्यानंतर त्याबाबतची सूचना लगेचच संबंधितांस एस.एम.एस (SMS)/ व्हॉट्सॲपवरून (Whatsapp) देण्याबाबत दक्षता घेण्यात यावी.

ड) उक्त पद्धतीने वरिष्ठांकडून प्राप्त सूचनेनुसार ईमेलद्वारे अंतिम मान्यतेसाठी सादर केलेला प्रस्ताव (फॉरवर्ड केलेला प्रस्ताव ) हा, तो सादर करणारे व अंतिम मान्यता देणारे या दोन्ही स्तरामधील अधिकाऱ्यांनी पाहिला, तपासला व मान्य केला आहे, असे गृहित धरण्यात येईल.

प्रस्ताव तयार करणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांनी प्रस्ताव ई-मेलद्वारे अंतिमत: फॉरवर्ड करण्यापूर्वी तो सर्व संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून फॉरवर्ड करावा व त्याची प्रत (C.C. मध्ये) सर्व संबंधित अधिकाऱ्यांना चिन्हांकित करावी.

४. तरी सर्व मंत्रालयीन अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव तसेच मंत्रालयाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख तसेच कार्यालय प्रमुख यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सदर सूचना त्यांचे नियंत्रणाखालील अधिकारी / कर्मचारी यांचे निदर्शनास आणाव्यात.

५. उक्त सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

६. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०२००६०५१४०३१९१९०७ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Rajesh Bhaskar Gaikwad

Digitally signed by Rajesh Bhaskar Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5b1378a498cdff3fdd9ea5370b71fae3eca97e85924d0e443758ade5f0221f9a, serialNumber=26e171ec96c63f6333217d12fb6da1c5a800ce18a7a6fd59abf19b8ed3f02a91, cn=Rajesh Bhaskar Gaikwad
Date: 2020.06.05 15:20:02 +05'30'

**( रा. भा. गायकवाड )**
**कार्यासन अधिकारी**

**प्रत :**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव (५ प्रती),

२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य,
६. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव(५ प्रती), मंत्रालय, मुंबई ४०००३२.
७. मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
८. सर्व मा.मंत्री / मा. राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
९. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
१०.मा.महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य ,
११.सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
१२.प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
१३.प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई
१४.प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय,
१५.सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
१६.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१७.प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
१८. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, मुंबई,
१९.राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग, मुंबई,
२०.सर्व विभागीय आयुक्त,
२१.आयुक्त, सर्व महानगर पालिका,
२२.व्यवस्थापकीय संचालक, BEST महामंडळ, मुंबई
२३.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, (MSRTC), मुंबई
२४.सर्व जिल्हाधिकारी,
२५.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२६.सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख / प्रादेशिक प्रमुख / कार्यालय प्रमुख,
२७.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (५ प्रती ),
२८. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरेक नं.१, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई ४०००२०.
२९.इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस(आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-४०००२५.
३०.नॅशनलीस्ट कॉंग्रेस पार्टी, ठाकरसी हाऊस, जे.एन.हेरेडीया मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई ४०००३८.

३१.शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-४०००२८.

३२.बहुजन समाज पार्टी, प्रदेश सचिव, महाराष्ट्र राज्य , बी.एस.जी.भवन, प्लॉट नं. ८३-अे, कलेक्टर कॉलनी, चेंबूर, मुंबई-४०००१४.

३३.भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई ४००००४.

३४.भारतीय कम्युनिस्ट(मार्क्सवादी) पार्टी, महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई ४०००१३.

३५.महाराष्ट्र नवनिर्माण सेवा, राजगड, मातोश्री टॉवर, शिवाजी पार्क, दादर, मुंबई ४०००२८.

३६.सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने, मंत्रालय, मुंबई ४०००३२

३७.निवड नस्ती (का.१८), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई४०००३२.

महाराष्ट्र शासन

क्र. करोना-२०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य ५
सार्वजनिक आरोग्य विभाग,
गो. ते. रुग्णालय आवार इमातर,
नविन मंत्रालय, मुंबई-४०० ००१.

दिनांक- ०५.०६.२०२०

प्रति,

विभागीय आयुक्त .......................... (सर्व)
जिल्हाधिकारी ............ ................. (सर्व)
जिल्हा पोलिस अधिक्षक .................. (सर्व)
आयुक्त, महानगरपालिका ............... (सर्व)

**विषय: शासकीय कर्मचाऱ्यांना प्रवास / शासकीय कामकाज करतांना येणाऱ्या अडचणीबाबत**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने अवगत करण्यात येते की, लॉकडाऊनमध्ये शिथीलता देण्यात आलेली आहे. तसेच, शासकीय कार्यालयात कामकाज सुरु होत आहे. अत्यावश्यक सेवा उदा. आरोग्य विभाग, पोलिस खाते पुर्ण कार्यक्षमतेने कार्यरत आहेत.

सर्व अत्यावश्यक सेवेतील उदा. पोलिस, आरोग्य व इतर विभागातील अधिकारी, कर्मचारी यांना कर्तव्यावर येणे क्रमप्राप्त आहे. तथापी, याबाबत लॉकडाऊनच्या सूचना योग्यप्रकारे सर्व संबंधितांना कदाचित प्राप्त न झाल्याने अनेकवेळा अडचणी येतात, असे निदर्शनास आले आहे. त्याचप्रमाणे विविध रहिवासी गृहनिर्माण संस्थांमध्ये सुध्दा विशेषत: महानगरामध्ये अत्यावश्यक सेवांच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना येण्या-जाण्यास अडचणी येत आल्याचेही निदर्शनास आले आहे.

त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत,

१) अत्यावश्यक सेवेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांना कार्यालयात किंवा ड्युटीच्या ठिकाणी उपस्थित राहणे आवश्यक आहे. यासाठी रहिवासी गृहनिर्माण संस्थांनी व अधिकारी / कर्मचाऱ्यांनी योग्य ती प्रतिबंधात्मक काळजी घ्यावी. मात्र, गृहनिर्माण संस्थांनी त्यांच्याकडील रहिवासी असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना वाईट वागणूक किंवा त्यांच्या येण्या-जाण्यास अडथळा आणण्यात येणार नाही, याबाबतच्या सक्त सूचना सर्व संबंधितांना द्याव्यात.

२) तसेच, शासकीय अत्यावश्यक सेवेतील अधिकाऱ्यांना, त्यांच्या शासकीय वाहनांना कर्तव्यावर असतांना जिल्हा बंदी लागू राहणार नाही, त्याचप्रमाणे वाहतूक परवान्याची आवश्यकता राहणार नाही, याबाबत सर्व संबंधितांस कळविण्यात यावे.

याबाबत आपल्या स्तरावरुन उपरोक्त बाबी सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात याव्यात, जेणेकरुन अत्यावश्यक सेवेचे कामकाज सुरळीत सुरु राहील.

प्रदीप व्यास 5-6-2020

( डॉ प्रदीप व्यास )
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत**

आयुक्त तथा अभियान संचालक, रा.आ.अ., मुंबई -१
संचालक आरोग्य सेवा, मुंबई / पुणे.